Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)*with*
International Impact Factor 8.249
Peer Reviewed Journal
https://doi.org/10.69758/GIMRJ2407IIIIV12P0022

e-ISSN No. 2394-8426
Special Issue on Scientific Research
Issue–II(II), Volume–XII

# शिक्षकांचे संघटनात्मक नागरिकत्व वर्तन आणि ताण यांच्यातील संबंधाचा अभ्यास

**प्रा. मनीषा लाकडे**
मानसशास्त्र विभाग,
संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती

**सारांश -** संघटन हे समाजाच्या प्रगतीच्या दृष्टीने महत्त्वाचे असते. कुठलेही कार्य एकट्याने करण्यापेक्षा समूहाने केले तर लवकर व कमी श्रमात होते म्हणूनच Unity is the best policy असे म्हटले जाते. शाळा ही समाज निर्मित संस्था असून मानवी व अमानवी घटकाच्या सहकार्याने ती कार्यरत असते. शिक्षण संस्थेमध्ये शिक्षक हा घटक महत्वपूर्ण आहे. शिक्षकाला विविध भूमिका पार पाडत असताना शिक्षकांचे मानसिक आरोग्य चांगले राहणे गरजेचे आहे कारण शिक्षकाला महत्त्वाच्या भूमिका पार पाडाव्या लागतात. विद्यार्थ्यांना अध्यापन करावे लागते, मुख्याध्यापकांना प्रशासकीय कामात हातभार लावावा लागतो तर सहकाऱ्यांना समस्या नीराकरणासाठी मदत करावी लागते म्हणून त्यांना ताण येऊ शकतो.

परंतु ताण येण्याच्या पाठीमागे कारणे कोणती याचा विचार केला तर शिक्षकाला त्याची भूमिका स्पष्ट नसल्याने किंवा मनाविरुद्ध काम करावे लागल्याने त्याच त्याच बाबी कंटाळवाण्या वाटल्याने टाळण्याची शक्यता आहे. शिक्षकाने जर इतरांशी जास्तीत जास्त आंतरक्रिया साधून विचारांचे आदान प्रदान केले तर त्याला त्याची स्व संकल्पना स्पष्ट होऊन वातावरणात होणाऱ्या घटनांचा व घटकांचा संबंध योग्य प्रकारे जोडून समन्वय साधता येईल म्हणजेच संघटनात्मक नागरिकत्व वर्तन हे शिक्षकाला भूमिकेतील स्पष्टता विरुद्ध भूमिका अपेक्षात्मक भूमिका संघर्ष व स्थगिती या बाबी कमी करण्यासाठी मदत पूर्ण ठरू शकते.

त्याकरिता सदर संशोधनात संघटनात्मक नागरिकत्व वर्तन व ताण याचा काही संबंध असू शकेल का ? हे अभ्यासासाठी याचा विचार करण्यात आला.

**मुख्य शब्द -** संघटनात्मक नागरिकत्व वर्तन, ताण आणि संबंध

**प्रस्तावना -**

मानव हा समाज प्रिय प्राणी आहे त्यामुळे मानवाला समूहामध्ये राहणे सुरक्षित वाटते. यामुळेच वेगवेगळ्या संघटनाची निर्मिती झाली. संघटना म्हणजे एकत्र गुंफण व बांधणी होय. यामुळे समाजामध्ये अनेक सामाजिक संस्थांची निर्मिती झाली. जसे शैक्षणिक संस्था, कुटुंब संस्था इत्यादी संस्थेचे अस्तित्व टिकून ठेवण्यासाठी संस्थेतील घटकांना कार्यरत राहावे लागते. संस्थेत दोन प्रकारचे घटक असतात. एक म्हणजे मानवी घटक व दुसरे म्हणजे अमानवी घटक. मानवी घटकांमध्ये व्यक्तींचा समावेश होत असल्याने संस्थेकरीत्या त्या टिकून राहण्यासाठी त्यांचे संघटन

Gurukul International Multidisciplinary Research Journal (GIMRJ)*with*
International Impact Factor 8.249
Peer Reviewed Journal
https://doi.org/10.69758/GIMRJ2407IIIIV12P0022

e-ISSN No. 2394-8426
Special Issue on Scientific Research
Issue–II(II), Volume–XII

असणे अत्यंत महत्त्वाचे आहे. तसेच प्रगतीच्या दृष्टीने कामाचा आकृतीबंध तयार करणे, एकमेकांना समजून घेणे, भविष्याच्या उद्दिष्टांची आखणी करणे आणि महत्त्वाच्या बाबींवर नियंत्रण ठेवणे या घटकांचा समावेश होतो.

समाजामध्ये शैक्षणिक संस्था महत्त्वाच्या भूमिका पार पाडतात. शैक्षणिक संस्थेत मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी या मानवी घटकांचा समावेश होतो. यामध्ये आंतरक्रिया साधल्या जातात. संघटन निर्माण होऊ शकते. शाळेतील विविध घटकांना एकत्र आणून त्यांच्या संघटन व एक्य भाव निर्माण करून त्या जिवंत समाज व समाज जीवन निर्माण करणे व ते विशिष्ट ध्येयधोरणानुसार गतिमान ठेवणे हे शैक्षणिक संघटनांचे कार्य आहे.

अध्यापनाच्या दृष्टीने शिक्षक हा केंद्रबिंदू आहे शिक्षक केंद्रबिंदू असल्याने वेगवेगळ्या महत्त्वाच्या भूमिका पार पाडाव्या लागतात. विद्यार्थ्यांना अध्ययनासाठी जास्त वेळ देणे, मुख्याध्यापकांना व्यवस्थापनाच्या कार्यासाठी मदत करणे, सहकार्यांना त्यांच्या अडचणीत मदत करणे इत्यादी कार्य पार पाडत असताना शिक्षकाला ताण येणे साहजिक आहे परंतु संघटित असल्याने इतरांची कामात मदत घेऊ शकतो व एकत्रित काम केल्याने ताण कमी होऊ शकतो.

व्यक्ती स्वतःच्या भावना इतरांजवळ व्यक्त करते म्हणजे संस्थेचा घटक अथवा नागरिक म्हणून शिक्षक आणि जबाबदाऱ्या पार पाडतात. ज्या व्यक्तीमध्ये संकटात मग नागरिकत्वाची जाणीव असेल ती व्यक्ती इतरांच्या कामात मदत करेल शाळेतील शिक्षकांचे संघटनात्मक नागरिकत्व वर्तन वाढविणे किंवा शाळा ही आपली आहे व आपण तिच्या प्रगतीसाठी एकत्र काम केले पाहिजे ही भावना विकसित करण्याचे काम मुख्याध्यापकाचे असते जर शिक्षकांना शाळेबद्दल आपुलकी असेल तर संस्थेच्या हितासाठी एकत्रित काम करू शकतील.

शिक्षकाला वेगवेगळ्या भूमिकेतून जात असताना भूमिकेची स्पष्टता नसल्याने त्याच त्याच बाबी करून कंटाळा आल्याने इतरांच्या अवास्तव अपेक्षा पूर्ण करण्यात वेळ जास्त जात असल्याने किंवा इच्छा नसताना काही कार्य करावे लागत असल्याने ताण येण्याची शक्यता आहे. व्यक्ती जितकी इतरांशी अंतरक्रिया असते तितकी तिची स्व संकल्पना तर स्पष्ट होतेच परंतु आजूबाजूच्या वातावरणातील अवबोध सुद्धा अधिक स्पष्ट होतात म्हणून आज संघटनात्मक नागरिकत्व वर्तन व व्यक्तीच्या भूमिकेतील अस्पष्टता विरुद्ध भूमिका अपेक्षात्मक भूमिका संघर्ष स्थगिती यांचा संबंध अभ्यास अभ्यासावा असे संशोधिकेस वाटले.

**उद्दिष्टे -**

1) शिक्षकांचे संघटनात्मक नागरिकत्व वर्तनाचे मापन करणे.
2) शिक्षकांच्या ताणाचे मापन करणे.
3) स्त्री शिक्षकांचे संघटनात्मक नागरिकत्व वर्तन आणि ताण यांच्यातील संबंधाचा अभ्यास करणे.

4) पुरुष शिक्षकांचे संघटनात्मक नागरिकत्व वर्तन आणि ताण यांच्यातील संबंधाचा अभ्यास करणे.

**परिकल्पना -**

1) शिक्षकांचे संघटनात्मक नागरिकत्व वर्तन आणि ताण यांच्यामध्ये लक्षणीय संबंध नाही. 2) स्त्री शिक्षकांच्या संघटनात्मक नागरिकत्व वर्तन आणि ताण यांच्यामध्ये लक्षणीय संबंध नाही. 3) पुरुष शिक्षकांचे संघटनात्मक नागरिकत्व वर्तण आणि ताण यांच्यामध्ये लक्षणीय संबंध नाही.

**साधने -**

प्रस्तु संशोधनासाठी संघटनात्मक नागरिकत्व वर्तन मापन श्रेणी तसेच ताण मापनश्रेणी या साधनांचा उपयोग करण्यात आला.

**कार्यपद्धती -**

प्रस्तुत संशोधनासाठी अमरावती जिल्ह्यातील 23 मराठी शाळांची निवड तसेच 199 शिक्षकांची निवड यादृच्छिक पद्धतीने केली गेली. यात 109 स्त्री शिक्षक व 90 पुरुष शिक्षकांची निवड करण्यात आली. याच शिक्षकांना विश्वासात घेऊन संशोधनाचा उद्देश स्पष्ट करण्यात आला. त्यानंतर जून डिसोजा यांनी तयार केलेली संघटनात्मक नागरिकत्व मापन श्रेणी व संशोधिका कृत ताणमापन श्रेणी सोडविण्याकरिता देण्यात आली. चाचणी सोडविण्याकरिता मर्यादित वेळ नव्हता पण शक्य तेवढ्या लवकर चाचणी सोडविण्यास सांगितले. चाचणी सोडवण्यापूर्वी चाचणी बाबतच्या सूचना व्यवस्थित समजल्या किंवा नाही याची दक्षता घेण्यात आली.

**फलिते -**

प्रस्तु संशोधनात शिक्षकांची संघटनात्मक नागरिकत्व वर्तन व ताण यांच्यातील संबंध काढण्यात आला.

त्याचे विवरण खालील प्रमाणे आहे -

प्रस्तुत संशोधनासाठी अमरावती जिल्ह्यातील शिक्षकांची निवड करण्यात आली. त्या १०९ स्त्री शिक्षक व 90 पुरुष शिक्षकांचा समावेश होता असे एकूण 199 शिक्षकांची निवड करण्यात आली. त्यात तीन परिकल्पना ठेवण्यात आल्या होत्या.

पहिली परीकल्पना ही शिक्षकांची संघटनात्मक नागरिकत्व वर्तन आणि ताण यांच्यामध्ये लक्षणीय संबंध नाही ही होती. प्रदत्त संकलनानंतर स्कोरिंग करण्यात आले. स्वाधीनता मात्रा 197 साठी शोधून काढलेला r हा 0.01 पातळीवर r पेक्षा जास्त असल्याने एकूण शिक्षकांचे संघटनात्मक

नागरिकत्व वर्तन आणि ताण यामध्ये लक्षनिय संबंध आहे. हा सहसंबंध ऋण असून 0.01 स्तरावर लक्षनिय आहे. त्यामुळे ही परिकल्पना त्याज्य ठरते

दुसरी परिकल्पना ही स्त्री शिक्षकांचे संघटनात्मक नागरिकत्व वर्तन आणि ताण यामध्ये लक्षणीय संबंध नाही ही होती स्कोरिंग केल्यानंतर स्वाधीनता मात्रा 107 साठी शोधून काढलेला r हा कोष्टकातील 0.01 पातळीवर r पेक्षा जास्त आल्याने स्त्री शिक्षकांचे संघटनात्मक नागरिकत्व वर्तन आणि ताण यामध्ये लक्षणीय सहसंबंध आहे हा सहसंबंध ऋण स्वरूपाचा असून 0.01 स्तरावर लक्षणीय आहे त्यामुळे परिकल्पना त्याज्य ठरते

तिसरी परिकल्पना ही पुरुष शिक्षकांचे संघटनात्मक नागरिकत्व वर्तन आणि ताण यामध्ये लक्षणीय संबंध नाही स्कोरिंग केल्यानंतर स्वाधीनता मात्रा 88 साठी शोधून काढलेला r हा 0.01 पातळीवर r पेक्षा जास्त असल्याने पुरुष शिक्षकांचे संघटनात्मक नागरिकत्व वर्तन आणि तान यामध्ये लक्षणीय सहसंबंध आहे. हा सहसंबंध ऋण स्वरूपाचा असून 0.01 स्तरावर लक्षणीय आहे. त्यामुळे परिकल्पना त्याज्य ठरते.

वरील विवेचनावरून खालील निष्कर्ष काढण्यात आले.

**निष्कर्ष -**

१) एकूण शिक्षकांचे संघटनात्मक नागरिकत्व वर्तन आणि ताण यातील सहसंबंध - 0.44 इतका असून तो 0.01 पातळीवर लक्षणीय असून ऋण व मध्यम स्वरूपाचा आहे.

२ स्त्री शिक्षकांचे संघटनात्मक नागरिकत्व वर्तन आणि तान यातील सहसंबंध - 0.53 इतका असून तो 0.01 पातळीवर लक्षणीय असून ऋण व मध्यम स्वरूपाचा आहे.

३) पुरुष शिक्षकांचे संघटनात्मक नागरिकत्व वर्तन आणि तान यातील सहसंबंध - 0.30असून तो 0.01 पातळीवर लक्षनिय असून ऋण व कमी स्वरूपाचा आहे.

**संदर्भ -**

1) करंदीकर सु. - शैक्षणिक मानसशास्त्र - दुसरी आवृत्ती फडके प्रकाशन, कोल्हापूर (1997)
2) तंबाखे आणि तडसरे - उपयोजित मानसशास्त्र - फडके प्रकाशन, कोल्हापूर (2001)
3) दांडेकर वा. ना. - शैक्षणिक मूल्यमापन व संख्याशास्त्र - श्री विद्या प्रकाशन, पुणे (1989)
4) Best j and kahn - Research in Education - Prentice Hall of india pvt. Ltd, New Delhi 2002.
5) Garrett H E. - Statistics in psychology and Education - Bombay Vaklis feffer and Simons pvt. Ltd 1973.
6) Newstorm J and Davis K - Organisational Behaviour Human Behaviour - at work 10th edition Dehli Tata Mc Graw hill publication com. Limited
7) Pareek U - Understanding Organisational Behaviour - Oxford University press (2004)